MHNS110032542023

नियमित दिवाणी दावा क्र.५३१/२०२३
सचिन वाघ व इतर वि. विमल वाघ व इतर

## निशाणी ५ वरील आदेश
## (आदेश पारीत दिनांक ०८.०४.२०२५)

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०५ यांनी दावा मिळकत दाव्याचा निकाल लागेपावेतो कोणत्याही प्रकारचे हस्तांतरण करु नये अथवा मिळकतीवर बोजे निर्माण करु नये असा तुर्तातूर्त ताकीद मिळण्याकरीता केला आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन की, गट क्रमांक ३१२ यांसी क्षेत्र ० हे ३९ आर ही दावा मिळकत मुळ पुरुष मयत शिवा भाउ वाघ यांची वडिलोपार्जित मालकी हक्काची होती. त्यांचे मृत्युपश्चात वारस म्हणुन वादी यांचे आजोबा मयत लक्ष्मण शिवा वाघ, शांताबाई बाबुराव सोनवणे, सरुबाई वामन जाधव, ठकुबाई निवृत्त अडांगळे यांचे नावे वारस नोंद क्रमांक १०२ अन्वये ७/१२ सदरी दाखल झाली. त्यानंतर दावा मिळकतीपैकी ० हे ४० आर इतके क्षेत्र प्रतिवादी क्रमांक ०६ यांना दि. २४.०४.१९९० रोजी खरेदीखताने विक्री झाले. त्यानंतर शांताबाई बाबुराव सोनवणे, सरुबाई वामन जाधव, ठकुबाई निवृत्त अडांगळे यांनी वादी यांचे आजोबा मयत लक्ष्मण शिवा वाघ याच्या लाभात विना मोबदला हक्क सोड करुन दिले. त्याअन्वये फेरफार नोंद क्रमांक १०७७ मंजुर झाली. त्याप्रमाणे वादी यांचे आजोबा मयत लक्ष्मण शिवा वाघ हे दावा मिळकतीचे ० हे ९९ आर इतके क्षेत्राचे एकमेव मालक व कब्जेदार झाले. मयत लक्ष्मण शिवा वाघ यांना तीन मुले नामे बाळु लक्ष्मण वाघ, गोविंद लक्ष्मण वाघ व मयत चिंधु उर्फ चिंतामण लक्ष्मण वाघ ही आहेत. वादी हे मयत चिंधु उर्फ चिंतामण लक्ष्मण वाघ यांचे कायदेशिर वारस आहेत. परंतु वादी यांचे आजोबा मयत लक्ष्मण शिवा वाघ यांनी दि.१४.०८.१९९८ रोजी वाटपाचा अर्ज देवुन बाळु उर्फ बाळासाहेब लक्ष्मण वाघ यांना ०० हे ४९ आर दक्षिणेची पुर्व पश्चिम वाटणी व लक्ष्मण गोविंद वाघ यांना ० हे ५० आर उत्तरेची पुर्व पश्चिम वाटणी असे वाटपपत्र करुन फेरफार नोंद क्रमांक १०७८ मंजुर केली. सदरच्या वाटपान्वये वादीचे वडिल मयत चिंधु उर्फ चिंतामण लक्ष्मण वाघ यांचा कायदेशिर वडिलोपार्जित हिस्सा

डावलला. वादी व वादीचे वडिल गावात राहत नसल्याचे गैरफायदा घेवुन त्यांना हिस्सा मिळु नये या हेतुने वाद मिळकतीतील वेगवेगळे क्षेत्र विक्री केलेले आहेत. गोविंद वाघ यांनी गट क्रमांक ३१२ पैकी ० हे २६ आर क्षेत्र स्वत:ची पत्नी म्हणजेच प्रतिवादी क्रमांक ०१ व प्रतिवादी क्रमांक ०४ यांना विक्री केले आहे. तसेच गोविंद वाघ यांनी वाद मिळकतीतील ० हे १ आर क्षेत्र प्रतिवादी क्रमांक ०१ यास विक्री केलेले आहेत. सदरील विक्री एकत्रिकरण कायदयाच्या विरुध्द असल्याने त्याची नोंद मंडळ अधिकारी यांनी रदद् केली आहे. गोविंद वाघ यांनी वाद मिळकतीपैकी २० आर क्षेत्र प्रतिवादी क्रमांक ०२ यांना विक्री केले व ० हे ३ आर क्षेत्र प्रतिवादी क्रमांक ०५ यांना विक्री केले. बाळु लक्ष्मण वाघ यांनी दावा मिळकतीपैकी ० हे ४ आर क्षेत्र दिपक अडांगळे यांना व ० हे २५ आर क्षेत्र ताराबाई अडांगळे यांना विक्री केले. त्यानंतर दिपक अडांगळे व ताराबाई अडांगळे यांनी सदरचे क्षेत्र रत्नाबाई रोटे यांना विक्री केले.

**३.** पुढे वादी असे कथन करतात की, प्रतिवादी क्रमांक १ते ०५ हे अनेक वर्षापासुन दावा मिळकत कब्जात ठेवुन उपभोग घेत आहेत. गट क्रमांक ३१२ ही मिळकत वादी यांचे वडिल चिंधु उर्फ चिंतामण लक्ष्मण वाघ यांची वडिलोपार्जित मिळकत असुन त्यात त्यांचा अविभाज्य हिस्सा आहे. त्यामुळे वाद मिळकतींची वरील झालेली खरेदीखते वादींचे हिश्यांवर बंधनकारक नाहीत. त्यामुळे वादीने सदरचा दावा त्याचा १/३ हिस्सा तुटक करुन तसा जाहिर ठराव करणेकामी व प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०५ यांनी केलेले खरेदीखतांचे दस्त वादीवर बंधनकारक नाही असा जाहिर ठराव करुन मिळणेकामी व तसा मनाई हुकुम देणेकामी केलेला आहे. पुढे वादी असे कथन करतात की, प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०५ यांना दाव्याचा निकाल होईपावेतो दावा मिळकत विक्री करणेकामी व बोजा निर्माण करणेकामी प्रतिबंधित करणे गरजेचे आहे.

**४.** प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०६ दाव्याचे कामी हजर झाले. परंतु फक्त प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांनी निशाणी क्रमांक २८ वर अर्जास जबाब व लेखी कैफियत दाखल केलेली आहे. प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांनी वादींची कथने स्पष्टपणे नाकारलेली आहेत. प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ असे कथन करतात की, गट क्रमांक ३१२ मधील क्षेत्र १ हे ३९ आर ही मिळकत मयत लक्ष्मण शिवा वाघ यांची स्वतंत्र मालकीची होती. वादीचे वडिल हे पुर्वीपासुन नाशिक येथे वेगळे राहत

असल्याने त्यांचे प्रापंचिक अडचणींसाठी त्यांना रकमेची आवश्यकता होती म्हणुन मयत लक्ष्मण शिवा वाघ व भाउ गोविंद वाघ व बाळु वाघ यांच्याकडे त्यांनी रक्कम रु.४२,०००/— ची मागणी केली. म्हणुनच त्याप्रमाणे वाद मिळकतीतील ० हे ४० आर क्षेत्र प्रतिवादी क्रमांक ०६ यास विक्री करुन त्याची रक्म रु.४२,०००/— वादींचे वडिल चिंधु उर्फ चिंतामण लक्ष्मण वाघ यांना दिले. म्हणुनच त्यांनी त्या खरेदीखतास संमती दिली. त्याप्रमाणे त्यांनी रु.४२,०००/— स्विकारुन वाद मिळकतीत असलेला त्यांचा हिस्सा, हक्क व अधिकार कायमचा सोडुन दिला. त्यानंतर वादी यांच्या वडिलांना पुन्हा प्रापंचिक अडचणींसाठी रक्कम रु.४५,०००/— गरज होती. त्याप्रमाणे गोविंद वाघ व बाळु वाघ यांनी मयत चिंधु उर्फ चिंतामण वाघ यांना दि.१५.०७.१९९८ रोजी रोख रक्कम रु.४५,०००/— देवुन त्याबदल्यात त्यांच्या हिश्याचे ० हे ३३ आर क्षेत्र स्टॅम्प पेपरवर वाटपपत्राचा दस्त करुन गोविंद वाघ व बाळु वाघ यांच्या लाभात करुन दिले. सदरच्या वाटपपत्रास मयत चिंधु उर्फ चिंतामण वाघ यांनी साक्षीदारासमक्ष सही करुन संमती दिली आहे. त्याप्रमाणे सदर वाटपपत्राची नोंद होवुन दावा मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राईटस्‌ला गोविंद वाघ व बाळु वाघ यांची नावे लागली. वादीचे वडिल मयत चिंधु उर्फ चिंतामण लक्ष्मण वाघ यांनी वाद मिळकतीतील त्यांच्या हिश्याच्या क्षेत्राचे हक्क व अधिकार सोडुन दिलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या वारसांनी दावा मिळकतीत हक्क व अधिकार मागण्याचा कुठलाही अधिकार नाही. पुढे प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ असे कथन करतात की, वादीने गोविंद वाघ व लक्ष्मण वाघ यांनी त्यांचे स्वतंत्र मालकीचे क्षेत्रापैकी काही मिळकत पुढे नोंदणीकृत खतान्वये विक्री केलेले आहेत. दावा मिळकती हया प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांच्या स्वतंत्र मालकीच्या व कब्जे वहिवाटीच्या आहेत. परिणामी, सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी मागणी केलेली आहे.

**५.** वादीतर्फे ॲड.श्री.पी.बी. गवळे यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांस अनेकदा संधी देवुनही युक्तीवादाकामी हजर न राहिल्याने सदरचा अर्ज त्यांच्या युक्तीवादाविना चालविण्याचा आदेश पारित केलेला आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता खालील वादप्रश्न माझे निर्णयाकरीता उपस्थित होतात. त्यावरील माझे निर्णय मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निर्णय |
|---|---|---|
| १. | दावा प्रथमदर्शनी वादीच्या बाजूने असल्याची बाब सिध्द होते काय ? | ....होकारार्थी |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय ? | होकारार्थी |
| ३. | अर्ज नामंजूर झाल्यास वादीला अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | होकारार्थी |
| ४. | अंतिम आदेश काय ? | ...अर्ज मंजुर करण्यात आला. |

:— **का र ण मि मां सा** :—

**वादप्रश्न क्र. १ ते ३ करीता** :—

**६.** कायदयाच्या सिध्दांतानुसार तात्पुरत्या मनाईच्या अर्जावर निर्णय घेताना काही प्रमुख तत्वे विचारात घेतली जातात. जसे की, वादी यांना सकृतदर्शनी केस आहे काय, सोयीचा समतोल कोणाच्या बाजुने आहे आणि अर्ज मंजुर केल्यास कोणाचे नुकसान होईल आणि पक्षकारांचे आचरण त्यांचे मागणीप्रमाणे मनाई आदेश देण्यास पात्र आहे काय हे मुददे् विचारात घेणे आवश्यक आहेत. सदरहु मुददे् एकमेकांशी सलग्न असल्याने चर्चेकरीता एकत्रित घेतलेले आहेत.

**७.** वादीने त्याच्या अर्जाच्या समर्थनार्थ दावा मिळकतीचा ७/१२ उतारा, फेरफार नोंद क्रमांक १०२, ७५०, १०७७, १०७८, २९०२, २२४७, २४७१, २०५२, २०५३, ३२२०, १७७९ च्या साक्षांकित प्रती, चिंतामण लक्ष्मण वाघ यांचा मृत्यु दाखला व शाळा सोडल्याचा दाखला, खरेदीखत दस्त क्रमांक १५९/१९९०, खरेदीखत दस्त क्रमांक १०९४/२०१७, खरेदीखत दस्त क्रमांक ७६१/२०१४, खरेदीखत दस्त क्रमांक २३८/२०२२ च्या साक्षांकित प्रती दाखल केलेल्या आहेत.

**८.** वादी असा युक्तीवाद करतात की, प्रतिवादींनी मयत चिंधु उर्फ चिंतामण लक्ष्मण वाघ यांचा वडिलोपार्जित मिळकतीमध्ये असणारा अविभाज्य हिस्सा डावलण्याच्या हेतुने अगोदरच दावा मिळकतीच्या काही क्षेत्रांची विक्री करुन गुंतागुंत निर्माण केली आहे. प्रतिवादींना जर दावा मिळकती पुढे विक्री व बोजा निर्माण करणेकामी प्रतिबंधीत केले नाही तर वादीचा अपरिमित असे नुकसान होईल. त्यामुळे प्रतिवादींना तसे प्रतिबंधीत करणे आवश्यक आहे.

९. वादींचा युक्तीवाद ऐकला. दाव्यातील वादींच्या कथनांचे, प्रतिवादीच्या कैफियतीचे व दाव्यातील दाखल कागदपत्रांचे अवलोकन करता प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, वादी आणि बाळु लक्ष्मण वाघ व गोविंद लक्ष्मण वाघ यांच्या नातेसंबंधाबाबत उभयपक्षकारांमध्ये कोणतेही वाद नाहीत. दाखल कागदपत्रांचे अवलोकन करता प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, दावा मिळकत वादी यांचे वडिल मयत चिंधु उर्फ चिंतामण लक्ष्मण वाघ गोविंद वाघ व बाळु वाघ यांची वडिलोपार्जित मिळकत होती. त्यामुळे त्यात वादी यांचे वडिल मयत चिंधु उर्फ चिंतामण लक्ष्मण वाघ यांचा अविभाज्य हिस्सा असेल यात दुमत नाही. प्रतिवादी असे कथन करतात की, वादी यांचे वडिल मयत चिंधु उर्फ चिंतामण लक्ष्मण वाघ यांनी वाटपपत्राचा दस्त करुन काही रक्कम स्विकारुन त्याबदल्यात त्यांचे हिश्याचे क्षेत्र त्यांचे भाउ गोविंद वाघ व बाळु वाघ यांचे लाभात करुन दिलेले आहेत. परंतु याठिकाणी हे नमुद करणे आवश्यक आहे की, प्रतिवादींनी त्यांच्या या कथनाच्या पृष्ठयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा पटलावर दाखल केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादींचे हे कथन या टप्प्यावर पृष्ठयर्थ कुठलाही पुरावा नसल्याने विचारात घेता येणार नाही. याउलट, हे नमुद करणे आवश्यक आहे की, प्रतिवादींनी देखील वादींचे वडिल मयत चिंधु उर्फ चिंतामण लक्ष्मण वाघ यांना वाद मिळकतीत हिस्सा होता हे अप्रत्यक्षपणे कबुल केलेले आहेत. वादी हे मयत चिंधु उर्फ चिंतामण लक्ष्मण वाघ यांचे कायदेशिर वारस आहेत. त्यामुळे वादींचा देखील दावा मिळकतीत हक्क व अधिकार आहे असे या टप्प्यावर सकृतदर्शनी दिसुन येते. या अनुषंगाने वादीच्या हक्कामध्ये प्रथमदर्शनी केस दिसुन येत आहे. गोविंद वाघ व बाळु वाघ यांनी दावा मिळकतीतील विक्री केलेल्या क्षेत्रांच्या संदर्भातील दस्तांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, जर प्रतिवादींना या टप्प्यांवर दावा मिळकत पुढे विक्री करण्यापासुन व बोजे निर्माण करण्यापासुन प्रतिबंधीत केले नाही तर दाव्याची गुंतागुंत वाढुन वादीस अपरिमित असे नुकसान होईल. त्यामुळे न्यायाचा व सोयीचा तराजु सुध्दा वादींच्या हितामध्ये आहे. परिणामी, मुदद्े क्रमांक ०१ ते ०३ निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवून मी खालीलप्रमाणे आदेश करत आहे.

**<u>आदेश</u>**

**१.** अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**२.** प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०५ यांनी गट क्रमांक ३१२ च्या संदर्भात

दाव्याचा निकाल लागेपावेतो कोणत्याही प्रकारचे हस्तांतरण करु नये किंवा मिळकतीवर बोजा निर्माण करु नये असा तात्पुरता मनाई आदेश देण्यात येत आहे.

३. खर्चाचा हुकुम अंतिम निकालाच्या वेळी केला जाईल.

४. येथे नमुद करणे आवश्यक आहे की, वरील आदेशातील नोंदविण्यात आलेल्या मुदद्यांचा अर्थ दाव्याच्या गुणवत्तेवर निर्णायक मत किंवा निष्कर्ष म्हणुन लावला जावु नये.

SNEHA PRADEEP DESHPANDE
Digitally signed by SNEHA PRADEEP DESHPANDE
Date: 2025.04.09 17:33:47 +0530

दि.०८.०४.२०२५

(एस.पी. देशपांडे),
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
निफाड